॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या माध्यमशास्त्र प्रशाळा आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, जळगांव जिल्हा शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने दर्पण दिनानिमित्त उद्या मंगळवार दि. ९ जानेवारी रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम सकाळी १०:३० वाजता सामाजिक शास्त्रे प्रशाळेच्या सभागृहात होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. व्ही.एल.माहेश्वरी राहणार आहेत. विशेष अतिथी म्हणून प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, उच्च शिक्षण जळगाव विभागाचे सहसंचालक डॉ. संजय ठाकरे हे उपस्थित राहणार आहेत. तर दर्जी फाऊंडेशनचे अध्यक्ष गोपाळ दर्जी, मंगलग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष दिगंबर महाले,माध्यमशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ.सुधीर भटकर,पत्रकार संघाच्या उत्तर महाराष्ट्राचे अध्यक्ष प्रवीण सपकाळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या दर्पण दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ जळगाव जिल्हा शाखेच्यावतीने प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, डिजिटल मीडिया व छायाचित्रकार अशा एकूण आठ जणांना दर्पणकार पुरस्कार जाहीर आले आहेत. यात – **प्रिंट मीडिया** : विलास बारी (लोकमत), प्रदीप राजपूत(दिव्यमराठी), देविदास वाणी(सकाळ), राजेंद्र पाटील(पुण्यनगरी), **इलेक्ट्रॉनिक मीडिया** : चंद्रशेखर नेवे(एबीपी माझा), सचिन गोसावी(दूरदर्शन), **डिजिटल मीडिया** : संतोष सोनवणे (**मॅक्स मराठी), छायाचित्रकार**: आबा मकासरे (छायाचित्रकार) यांचा समावेश आहे.

तरी जिल्ह्यातील पत्रकार, पत्रकार संघाचे पदाधिकारी, सदस्य, विद्यार्थी यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन माध्यम शास्त्र प्रशाळेचे डॉ. गोपी सोरडे, डॉ.सोमनाथ वडनेरे, ॲड. सूर्यकांत देशमुख, रोहित देशमुख, पत्रकार संघांचे खान्देश विभागाचे अध्यक्ष किशोर रायसाकडा, जिल्हाध्यक्ष शरद कुलकर्णी, ग्रामीण जिल्हाध्यक्ष, नागराज पाटील,ग्रामीण जिल्हाध्यक्ष, संतोष नवले, महानगराध्यक्ष कमलेश देवरे यांनी केले आहे.

**बातमी नं. २**

जळगाव दि. ८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आंतर विद्याशाखीय अभ्यास प्रशाळेत शिक्षणशास्त्र विभाग, विद्यार्थी विकास विभाग आणि क्षमता निर्माण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु असलेल्या 'आत्मनिर्भर युवती अभियान' कार्यशाळेत वारली चित्रकारिता कौशल्य विकसन प्रशिक्षण देण्यात आले.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील डॉ. संगिता महाजन यांनी वारली या आदिवासी संस्कृतीबद्दल माहिती देवून वारली चित्रकारितेतील मुलभूत प्रशिक्षण प्रात्यक्षिकांसह करून दाखविले. यावेळी संचालक डॉ. मनिषा इंदाणी, डॉ. संतोष खिराडे, डॉ. स्वाती तायडे उपस्थित होते. कार्यशाळेचे समन्वयक म्हणून डॉ. रणजित पारधे, सहसमन्वयक म्हणून प्रणाली सोनवणे यांनी काम पाहिले. ४० विद्यार्थिनींनी यात सहभाग घेतला.

६ जानेवारी रोजी याच कार्यशाळेत बँकेसंदर्भातील सेवा, आर्थिक व्यवहार आणि काळजी या विषयावर वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील यांनी मार्गदर्शन केले. ८ जानेवारी रोजी महिलांच्या आरोग्यविषयक समस्या आणि उपाययोजना यावर डॉ. लिना चौधरी यांनी मार्गदर्शन केले.

…………………………………………………………………………………………………………..

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ८ जानेवारी, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी